दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.३ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४३ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 3 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 243 | Pages 4 | Rate 4 Rs

### बच्चू कडूंचे विधान परिषदेवर जाण्याचे संकेत

**मुंबई**–प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी आपल्या संघटनेची शिवसेनेसोबत होणाऱ्या संभाव्य विलिनीकरणाच्या मुद्यावरील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी या प्रकरणी मुद्यांवर आधारित शिवसेनेची युती करण्याची तयारी दर्शवली आहे. आम्ही खूप संघर्षातून संघटना उभी केली आहे. त्यामुळे विलिनीकरणाच्या बातम्या पाहून दुःख वाटले. आम्हाला कोणत्याही पक्षाचा पाठिंबा नाही. पाठिंबा देतो म्हटले तरी आम्ही घेत नाही. एवढे आम्ही तटस्थ आहोत, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी कागदपत्रे माझ्या बॅगेतच आहेत, असे सांगत विधान परिषदेवर जाण्याची आपली तयारी असल्याचेही स्पष्ट केले.माजी मंत्री बच्चू कडू यांचा प्रहार पक्ष शिवसेनेत विलीन होणार असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेषतः शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची ऑफर देण्यात आल्याचाही दावा केला जात आहे. बच्चू कडू यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना या प्रकरणी विस्तृत भाष्य केले.

# पुणे जिल्ह्यातील घटना अत्यंत निंदनीय

## प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला मृत्यूदंड होईल याची काळजी घेतली जाईल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवील यांनी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात एका ४ वर्षीय चिमुकलीवरील बलात्कार व हत्या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. पुणे जिल्ह्यातील घटना घटना अत्यंत निंदनीय व दुःखदायक आहे. या प्रकरणी सर्वांना हळहळ वाटत आहे. सरकार हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपी नराधमाला मृत्यूदंड होईल याची काळजी घेईल, असे ते म्हणालेत.भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका ६५ वर्षीय नराधमाने साडेतीन वर्षीय निष्पाप बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केली आहे. भिमराव कांबळे असे आरोपीचे नाव आहे. त्याने मृत चिमुकलीला वासरू दाखवण्याचा बहाणा करत गुरांच्या गोठ्याकडे नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवला. या घटनेमुळे राज्यात संतापाची लाट उसळली आहे. नसरापूर येथे नागरिकांनी पुणे – सातारा महामार्गावर रास्ता रोको करून आपला रोष व्यक्त केला.

पत्रकारांनी आज याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना छेडले असता त्यांनीही या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला. मुख्यमंत्री म्हणाले, पुणे जिल्ह्यातील घटना अत्यंत निंदनीय व दुःखदायक आहे. तीन साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षांच्या नराधमाने अत्याचार केला व खूनही केला. आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीचे अशा प्रकारचे जुने संदर्भही दिसत आहेत. या घटनेमुळे समाजात रोष निर्माण झाला आहे. सर्वांनाच मुलगी व तिच्या कुटुंबीयांबद्दल हळहळ वाटत आहे. मी आश्वस्त करू इच्छितो की, हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात येईल.या प्रकरणी विशेष फास्टट्रॅक कोर्ट स्थापन करण्यासाठी सरकारतर्फे हायकोर्टाला विनंती केली जाईल. तसेच स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटर देऊन कमीत कमी वेळात या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी आम्ही कोर्टापुढे करणार आहोत.




### विरोधकांवर साधला निशाणा

**मुख्यमंत्र्यांनी यावेळी या प्रकरणाचे राजकारण करणाऱ्या विरोधकांनाही चांगलेच फटकारले. हे अत्यंत असंवेदनशील आहेत. प्रत्येक गोष्टीत राजकारण शोधून काढणे याहून अधिक वाईट काहीच असू शकत नाही. काही गोष्टीत तरी संवेदना पाळली पाहिजे. त्यांनी काही केले तरी हरकत नाही. पण राज्य सरकार जे करायला पाहिजे, ते नक्की करेन, असे ते म्हणाले.**

## पिंपळगाव येथे पोहणे शिकायला गेलेल्या शाळकरी मुलाचा विहिरीतील पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू; थर्माकोल सुटल्याने घडली दुर्घटना

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**
केज तालुक्यातील पिंपळगाव येथील आठवीच्या वर्गात शिक्षण घेणारा विद्यार्थी विराज विशाल शिनगारे वय १४ वर्षे हा सांगवी शिवारा तील विहिरीत थर्माकोल कमरेला बांधून पोहायला शिकण्यासाठी गेला असता,कमरेचे थर्माकोल अचानक सुटल्यामुळे ३५ फूट खोल पाण्यात बुडून गुरूवारी त्याचा मृत्यू झाला आहे.पिंपळगाव येथील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेत इयत्ता आठवीच्या वर्गात शिक्षण घेणारा विराज विशाल शिनगारे वय १४ वर्षे हा विद्यार्थी गुरुवार दि.३०एप्रिल रोजी दुपारी आपल्या मित्रांसोबत सांगवी शिवारातील बाळासाहेब केदार यांच्या शेतातील गबार नावाच्या विहिरीवर पोहायला शिकायला गेला होता.पोहायला शिकण्यासाठी त्याने कमरेला थर्माकोल बांधून विहिरीत उडी मारली





असता,त्याच्या कमरेला बांधलेले थर्माकोल सूटल्यामुळे तो विहिरीतील ३५ फूटखोल पाण्यात बुडून मृत्यूमुखी पडला.या दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे,सहाय्यक पोलीस उप निरीक्षक पी.टी. चव्हाण,शंभूराज दराडे व गृहरक्षक दलाचे जवान सुरज भैरट यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेवुन प्रारंभी स्थानिक पातळीवर शोधमोहीम राबविली. परंतु त्यात यश न आल्यामुळे पैठण येथील बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. या पथकाने गुरूवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान पार्थिव बाहेर काढल्या नंतर केज येथील उप जिल्हा रुग्णालयात शुक्रवारी सकाळी उत्तरीय तपासणी केल्यानंतर पिंपळगाव येथे शुक्रवारी दुपारीं १ वाजण्याच्या दरम्यान विराजच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## केजकरांच्या सेवेत नवा टप्पा आ.मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश

### उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटरचे लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**
केज मतदारसंघाच्या विकासासाठी सदैव तत्पर असणाऱ्या, लोकप्रिय आ.नमिताताई मुंदडा यांच्या शुभहस्ते केज येथील उपजिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक डायलिसिस सेंटरचे भव्य उद्घाटन नुकतेच उत्साहात संपन्न झाले.
आधुनिक सुविधा: एकाच वेळी ५ मशिन्स द्वारे रुग्णांवर उपचार होणार,राज्यातील मानाचे स्थान महाराष्ट्रात मंजूर झालेल्या केवळ ०९ केंद्रांपैकी एक केंद्र केज मध्ये!मोफत/सवलतीत उपचार मिळणार केज व परिसरातील गरजू रुग्णांना आता उपचारासाठी इतरत्र शहरांकडे धाव घेण्याची गरज नाही.या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी सिव्हिल सर्जन डॉ.सोळुंके साहेब, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे साहेब, नगराध्यक्षा सौ.सितताई



बनसोड,गटनेते हारुणभाई इनामदार, उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर,भाजप तालुका अध्यक्ष भगवान केदार, राहुल भैय्या गदळे,सर्व डॉक्टर,परिचारिका, पत्रकार बांधव आणि मतदार संघातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.केज आणि परिसरातील जास्तीत जास्त रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, जेणेकरून त्यांना वेळेत आणि दर्जेदार उपचार मिळतील असेआ.नमिता मुंदडा यांनी उप जिल्हा रुग्णालय केज येथे लोकार्पण प्रसंगी आवाहन केले आहे.

# महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

### विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर बीड जिल्हा घडविण्याचा संकल्प करुया–पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**
मराठवाड्याची भूमी ही संतांची, महंतांची, शूरांची, वीरांची, बुद्धीवंतांची आणि कर्तृत्ववान सुपुत्रांची भूमी आहे. या भूमीला धैर्याचा, शौर्याचा, संघर्षाचा वारसा आहे. संत गोरोबाकाकांच्या पवित्र तेर नगरीत माझा जन्म झाल्यामुळे माझे या भूमीशी एक अतूट नातं आहे. मराठवाड्याची लेक म्हणून या मातीतल्या संस्कारांचा आणि वारशाचा मला अत्यंत अभिमान आहे. आपण सर्वजण एकत्र येऊन विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर बीड जिल्हा घडवण्याचा संकल्प करूया, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

बीड येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा आज श्रीमती पवार यांच्या हस्ते येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या की, जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. युवकांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण आणि कौशल्य मिळावे यासाठी 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या सहकार्याने 'एमआयडीसी'त सुमारे १९७ कोटी रुपयांचा 'सी–ट्रिपल आयटी' प्रकल्प उभारण्यात येत आहे. याचे काम प्रगतीपथावर असून जिल्ह्यातल्या सात हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे.


उदयोन्मुख खेळाडूंसाठी क्रीडा संकुलातल्या सुविधांचा विकास करत २५ कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत. येत्या जुलै २०२६ मध्ये 'स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा' सुध्दा होणार असून, यामुळे राज्यातील खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी आणि पुढील पातळीवर झेप घेण्यासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. 'बीड–अहिल्यानगर–परळी वैजनाथ' रेल्वे मार्गाच्या उर्वरित कामांसाठी सुध्दा निधी मंजूर करण्यात आला असून हा महत्त्वाचा दळणवळण प्रकल्प लवकरच पूर्णत्वास नेण्याचा आपला संकल्प आहे. 'एमआरआय' सुविधा, माता–बाल संगोपन सेवा आणि इतर आधुनिक आरोग्य सुविधा यामुळे बीड जिल्हा आरोग्यदृष्ट्या अधिक सक्षम होत आहे. 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेत बीड जिल्ह्याने अत्यंत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राज्यात घरकुले पूर्ण करण्यामध्ये बीड जिल्ह्याने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी नियोजन विभागाने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), सन



२०२६–२७ अंतर्गत जिल्ह्याकरिता ६२३ कोटींचा आराखडा मंजूर केला आहे. आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास या क्षेत्रांसाठी जिल्हा नियोजन योजनेत मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली आहे. म्हणजे दि. १ मे ते दि. १५ मे २०२६ या कालावधीत वेबपोर्टवर जाऊन 'स्व–गणना' करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रत्येक कुटुंबाने संकेतस्थळावर जाऊन स्वतःची माहिती नोंदवावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.
'शिव–शाहू–फुले–आंबेडकरां'च्या विचारांवरच राज्य सरकारचे काम सुरु आहे, यापुढे सुध्दा ते सुरु राहील, हा शब्द या निमित्ताने राज्यातल्या जनतेला यावेळी त्यांनी दिला. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण या सर्व क्षेत्रांत समतोल आणि शाश्वत विकास साधत बीड जिल्ह्याला महाराष्ट्रातील अग्रगण्य जिल्हा बनवूया. त्यासाठी आपण सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.
जिल्ह्याने 'महाराष्ट्र राज्य सेवा हक्क' अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीत उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात आदर्श निर्माण केला आहे. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली ९०.१३ टक्के सेवा निर्धारित कालावधीत देत कार्यक्षमतेचा उच्चांक गाठला आहे. या कामगिरीबद्दल आपल्या जिल्हाधिकाऱ्यांचा राज्याच्या मुख्य सचिवांच्या हस्ते दोन दिवसांपूर्वी मुंबईत विशेष सन्मान करण्यात आला हा आपल्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. असे सांगून त्यांनी महाराष्ट्र दिनाच्या, कामगार दिनाच्या आणि बुध्द पौर्णिमेच्या मनापासून शुभेच्छाही जनतेला दिल्या.
ध्वजारोहणानंतर पोलीस दलाचे शानदार संचलन झाले. उत्कृष्ट काम केल्याबद्दल राज्यस्तरीय उत्कृष्ट पोलिस पाटील पुरस्काराने ज्ञानोबा मुंडे यांचा यशोचित सन्मान करण्यात आला. तसेच पोलीस, गृहरक्षक दल, पोलिस बँड पथक, एआय सर्वेलन्स वाहन, अग्निशामक दल, रुग्णवाहिका यांच्या पथकाने यावेळी मानवंदना दिली त्यानंतर विविध क्षेत्रातील पुरस्कार विजेते आणि जिल्हा पुरस्कार विजेते, महासंचालक यांचे पोलिस पदक प्राप्त पोलिसांचा मंत्रिमहोदयांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# संपादकीय

## भारतीय पर्यटनाचे स्वरूप बदलणारे 'सॅफ्रनस्टेज'



भारतीय प्रवाशांची मानसिकता गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलत आहे. केवळ पर्यटन स्थळ पाहणे इतक्यावर समाधान न मानता, आता प्रवासी त्या ठिकाणाच्या संस्कृतीत मिसळून 'स्थानिकांसारखे' जगण्याचा अनुभव शोधत आहेत. याच बदलत्या प्रकृत्तीला ओळखून एक अनोखी वाट चोखाळली ती 'सॅफ्रनस्टेज' या कंपनीने.२०१६ साली तेजस परुळेकर यांनी स्थापन केलेली ही कंपनी आज देशभरातील नयनरम्य ठिकाणी खासगी, आलिशान बंगल्यांमधून प्रवाशांना वेगळाच अनुभव देत आहे. एका कर्मचाऱ्यापासून सुरू झालेला हा प्रवास आज ११५ कर्मचारी, ३५० केअरटेकर्स आणि तब्बल ४५ कोटी रुपयांच्या वार्षिक उलाढालीपर्यंत पोहोचला आहे. या यशामागे आहे एक साधी, पण प्रभावी कल्पना. तेजस आणि तिचे पती देवेंद्र परुळेकर यांनी आपल्या युरोप प्रवासादरम्यान अनुभवलेल्या 'बेड अँड ब्रेकफास्ट' आणि अपार्टमेंट स्टेने त्यांना विचार करायला भाग पाडले. लहान मुलांसोबत प्रवास करताना हॉटेलपेक्षा खासगी जागा, स्वयंपाकघर आणि निवांत वातावरण किती महत्त्वाचे आहे, हे त्यांना जाणवले.स्पेन आणि फ्रान्समधील संथ, आरामदायी सुट्ट्यांचा अनुभव घेतल्यानंतर त्यांच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला. भारतामध्ये अशी सोय सहज का उपलब्ध नाही?मुंबईत वाढलेल्या तेजसला प्रवासाची आवड लहानपणापासूनच होती. तिच्या वडिलांच्या नोकरीमुळे तिच्या कुटुंबाला माथेरान, महाबळेश्वरसारख्या ठिकाणी हॉलिडे होम्समध्ये राहण्याचा अनुभव मिळत असे. तिचं कुटुंब एका आठवड्यासाठी पूर्ण बंगला भाड्याने घेत. स्वयंपाकीसोबत असायचा. तो संपूर्ण बंगला आपल्यासाठी आहे ही भावना काही काळापुरती का असेना पण समाधान देऊन जायची. तो अनुभव अविस्मरणीय तेजससाठी होता. आर. ए. पोदार कॉलेजमधून शिक्षण घेतल्यानंतर तेजस हिने सनदी लेखापाल अर्थात चार्टर्ड अकाऊंटंटचा अभ्यासक्रम पूर्ण केला. आयसीआयसीआय लिमिटेडमध्ये मुख्य व्यवस्थापक पदापर्यंत मजल मारली. कालांतराने तिचे लग्न देवेंद्र परुळेकर यांच्यासोबत झाले. ते अर्न्स्ट अँड यंग या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत होते. स्थिर करिअर असूनही, काहीतरी वेगळे करण्याची इच्छा तेजसला स्वस्थ बसू देत नव्हती. अनेक वर्षांच्या संशोधन आणि नियोजनानंतर २०१४ मध्ये तिने 'सॅफ्रनस्टेज'ची सुरुवात केली. सुरुवातीला ही कंपनी फक्त होमस्टे एग्रीगेटर म्हणून कार्यरत होती. मात्र, २०१५ मध्ये माथेरानमधील एका १०० वर्षे जुन्या पारशी घराच्या व्यवस्थापनाची संधी मिळाली आणि इथेच व्यवसायाला नवे वळण मिळाले. त्या क्षणापासून सॅफ्रनस्टेजने केवळ घरांची यादी न देता, स्वतः त्या मालमत्तांचे व्यवस्थापन आणि देखभाल करण्याचा निर्णय घेतला. यामुळे ग्राहकांना अधिक दर्जेदार आणि विश्वासार्ह अनुभव मिळू लागला.आज सॅफ्रनस्टेजकडे सुमारे २७० हून अधिक मालमत्ता उपलब्ध आहेत. मुंबईजवळील कर्जत, लोणावळा, पालघरपासून ते उत्तर भारतातील शिमला, मनाली, नैनिताल आणि दक्षिणेतील कुर्ग, ऊटी, वायनाडपर्यंत या सेवा विस्तारल्या आहेत. कोविड-१९ महामारीने जिथे अनेक व्यवसायांना फटका बसला, तिथे सॅफ्रनस्टेजसाठी हा टर्निंग पॉइंट ठरला. लोकांनी गर्दीच्या हॉटेल्सऐवजी खासगी व्हिलांना पसंती दिली. २०१९-२० मध्ये १५ कोटी असलेली उलाढाल त्याच्या पुढच्या वर्षी २० कोटींवर पोहोचली. लॉकडाऊननंतर तर ९०% पर्यंत बुकिंग्स व्हायचे असा तेजसचा दावा आहे. सॅफ्रनस्टेजचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्थानिक समुदायांवर दिलेले लक्ष. कंपनी स्थानिकांना केअरटेकर म्हणून नोकऱ्या देते. स्थानिक अन्नसाहित्य वापरते. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते. विशेष म्हणजे, कंपनीत ३५% महिला कर्मचारी आहेत. जे लैंगिक समतेच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.यशाच्या या प्रवासात त्यागही तितकाच महत्त्वाचा आहे. तेजस सांगते, आम्ही आमची जीवनशैली साधी ठेवली. महागड्या गोष्टींचा मोह टाळला. उद्योजकतेसाठी हा त्याग आवश्यक असतो. सॅफ्रनस्टेजचे लक्ष्य आता आणखी मोठे आहे. वर्षाअखेरीस २०० नवीन घरे जोडण्याची योजना असून, किल्ले, राजवाडे आणि वारसा स्थळांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. याशिवाय 'सॅफ्रनस्टेज जर्नीज' या ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मद्वारे संपूर्ण प्रवास अनुभव देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. आजच्या बदलत्या पर्यटन युगात, सॅफ्रनस्टेजने एक नवा ट्रेंड निर्माण केला आहे. प्रवास म्हणजे केवळ ठिकाण पाहणे नव्हे, तर त्या ठिकाणाला अनुभवणे. भारतातील खऱ्या संस्कृतीचा अनुभव घ्यायचा असेल, तर सॅफ्रनस्टेज हे पहिले नाव असावे, हे तेजसचं स्वप्न आहे.एक अनुभव व्यवसायात कसा बदलू शकतो याचं हे उत्तम उदाहरण आहे.

# उपमुख्यमंत्री मा.सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील जनगणना २०२७ च्या स्वगणनेचा शुभारंभ

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते आज जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणनेचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. त्यांनी https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर स्वतः लॉगिन करून स्वतःची प्राथमिक माहिती भरत स्वगणनेचा शुभारंभ केला.

१ मे ते १५ मे दरम्यान होणाऱ्या स्वगणना व घरगणनेच्या प्रक्रियेचा यावेळी औपचारिक प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी मा.जितीन रहमान व पोलीस अधीक्षक मा. नवनीत कावत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मा.शिवकुमार स्वामी व उपजिल्हाधिकारी मा.शैलेश सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा जनगणना कार्यालयाच्या वतीने उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे व जिल्हा समन्वयक आशिष शिंदे यांनी स्वगणनेची माहिती सांगितली.

जनगणना ही देशाच्या नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, सर्व नागरिकांनी स्वगणनेत सहभागी होऊन अचूक माहिती देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री मा.सुनेत्राताई पवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# देवगांव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगांव येथेदि.३० एप्रिल गुरुवार रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांची १३५ वीजयंती गावातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहपुर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.देवगांव येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती निमित्ताने दि.३० एप्रिल गुरुवार रोजी सकाळी समाज मंदिरा समोरील भव्य प्रांगणात कृष्णा बँकेचे चेअरमन तथा माजी जि.प.सदस्य विजयकांत भैय्या मुंडे, सुरेश गायकवाड नवी मुंबई,उपसरपंच सुभाष मुंडे,रामू नागरगोजे, अमोल मुंडे,एकनाथ गायकवाड यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.या ठिकाणी महामानव तथागत गौतम बुध्द व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करुन बुध्दवंदना घेण्यात आली.यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्याचे भीम जयंती उत्सव समीतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी पुष्पहार देऊन स्वागत केले.ही जयंती यशस्वी

करण्यासाठी डॉ.शरद गायकवाड,अर्जून गायकवाड,अरुण कांबळे,चिवळा गायकवाड,राणू कांबळे,लिंबाजी गायकवाड, दैवान कांबळे,विशाल गायकवाड,अजय कांबळे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेऊन ही जयंती साजरी केली.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महादेव गायकवाड यांनी केले.

# केजमध्ये सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला सोनवणे बंधूंचा वाढदिवस



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांचे चिरंजीव सौरव दादा सोनवणे व गौरव भैय्या सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त केज शहरात विविधसामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.शनिवार,दि.२ मे २०२६ रोजी पार पडलेल्या याउपक्रमांमुळे वाढदिवसाला समाजसेवे ची जोड मिळाली. उपजिल्हा रुग्णालय,केज येथे रुग्णांना फळांचे वाटप तसेच नवजात बालकांसाठी बेबी शॉलचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकां कडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.तसेच दर्गा येथे चादर अर्पण करून सर्वांच्या सुख-समृद्धी साठी प्रार्थना करण्यात आली.त्यानंतर बालाजी मंदिर,केज येथे दर्शन घेऊन धार्मिक वातावरणात कार्यक्रम पार पडला.उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर धारूर चौक येथे पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.या उपक्रमामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून,हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला.

एकूणच,सोनवणे बंधूंचा वाढदिवस साधेपणाने पण समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आल्याने सर्व स्तरातून त्याचे स्वागत करण्यात आले.

# साबला आनंदवाडी येथे बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी; महापुरुषांच्या विचारांना अभिवादन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील साबला आनंदवाडी येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती अर्थात 'बुद्ध पौर्णिमा' मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने गावातील ग्रामस्थ,महिला आणि तरुणांनी एकत्र येत भगवान बुद्धांच्या शांतता आणि समतेच्या विचारांना उजाळा दिला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्वांनी भगवान बुद्धांना वंदन केले आणि सामूहिक बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर 'नमो बुद्धाय'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.यावेळी कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाला उपसरपंच कचराबाई सरवदे,जिल्हा परिषद शाळा आनंदवाडी येथील मुख्याध्यापिका



गीता अंडील मॅडम,शिवसेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे,ज्येष्ठ शिवसैनिक भागवत तात्या काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यासोबतच अक्षय सरवदे,विकास सरवदे, अनिल सरवदे,अनिल एकनाथ सरवदे, बाबाराजे सरवदे,अजित सरवदे,अमोल सरवदे, भैय्यासाहेब सरवदे, मोहन सरवदे,दयानंद जाधव,छत्रभुज सरवदे, उत्तम सरवदे,सुरेश सरवदे,राजेंद्र सरवदे, रावण कांबळे यांच्यासह गावातील तरुण मित्र मंडळ आणि मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.भगवान बुद्धांचे विचार आजही जगाला शांततेचा मार्ग दाखवणारे आहेत,अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी आनंदवाडी येथील युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# सिद्दीकींना भावुक होऊन नाही,तर मेरिट पाहून उमेदवारी:मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधान परिषद निवडणुकीसाठी माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी जाहीर होताच अजित पवार गटातील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. पक्षाचे आक्रमक आमदार अमोल मिटकरी यांनी आपल्याला डावलल्याची खंत व्यक्त करत थेट बंडाचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मैदानावर उतरत हा निर्णय भावनेच्या भरात नाही, तर मेरिटवर आधारित आहे, असे सांगत डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला आहे.आमदार अमोल मिटकरी यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त करताना पक्षाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मला उमेदवारी नाकारताना पक्षाने साधं विश्वासात घेण्याचं सौजन्यही दाखवलं नाही, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. अजित पवारांच्या विमान अपघाताच्या प्रकरणाचा संदर्भ देत, याबद्दल प्रश्न विचारल्याचे फळ मला मिळाले का? असा बोचरा सवाल त्यांनी विचारला आहे. भविष्यात अजित पवारांच्या अपघाती मृत्यूसंदर्भात जे सोबत असतील, त्यांच्यासोबत मी जाईन, असे विधान करून मिटकरींनी आपण पक्षाच्या चौकटीबाहेर विचार करू शकतो, असे मोठे संकेत दिले आहेत. मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, मिटकरी यांचा काहीतरी गैरसमज झाला असावा. पक्षात प्रत्येक निर्णय हा सर्वांना विश्वासात घेऊनच घेतला जातो. बाबा सिद्दीकी यांचे मुंबईच्या विकासातील आणि पक्षातील योगदान मोठे आहे. झिशान सिद्दीकी हे स्वतः अनुभवी आमदार राहिले आहेत. त्यामुळे केवळ सहानुभूती म्हणून नाही, तर त्यांची ज्येष्ठता आणि मुंबईतील राजकीय समीकरणे पाहूनच सुनेत्रा वहिनींनी हा निर्णय घेतला आहे.विधान परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या एकमेव जागेसाठी पक्षाने झिशान सिद्दिकींना संधी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट



पडल्यानंतर काँग्रेसची साथ सोडून अजित पवारांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारे बाबा सिद्दिकी हे पहिले बडे नेते होते. त्यांच्या निधनानंतर सिद्दिकी कुटुंबाची राजकीय वारसदारी झिशान सिद्दिकी समर्थपणे सांभाळत आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी झिशान यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यांच्या याच निष्ठेचा विचार करून पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठवण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर झिशान सिद्दिकी म्हणाले की, मी वहिनी साहेब, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, पार्थ पवार यांचे आभार मानतो. त्यांनी मला एक संधी दिली. अजितदादांचा जो वादा होता, तो त्यांनी पूर्ण केला. माझ्यासारख्या युवा नेतृत्त्वाला त्यांनी विधान परिषदेत पाठवले. देशातील युवा वर्गाला राष्ट्रवादी पक्षाशी जोडण्यासाठी मी पूर्णपणे प्रयत्न करेल. अल्पसंख्याकांसाठी आवाज उठवेल. वहिनी साहेबांच्या नेतृत्त्वा महिला सक्षमीकरणासाठी काम करू. आपले दुःख बाजुला ठेवून आपल्याला लोकांसाठी काम करायचे आहे.

# मालवंडी येथे आजपासून श्री शेखागौरी यात्रा महोत्सवाची धामधूम; हिंदू-मुस्लिम ऐक्याचा अद्भुत संगम

## बार्शी तालुक्यातील मालवंडीमध्ये श्री शेखागौरी यात्रेला सुरुवात; तीन दिवस रंगणार धार्मिक व सांस्कृतिक सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**बार्शी । प्रतिनिधी**

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या श्री शेखागौरी यात्रेनिमित्त मालवंडी (ता. बार्शी) येथे सालाबादप्रमाणे यंदाही भव्य व आकर्षक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज दि. १ मे २०२६ पासून सुरू होणारा हा यात्रा महोत्सव दि. ३ मे २०२६ पर्यंत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

वर्षभराच्या धकाधकीनंतर गावकऱ्यांसह पुणे-मुंबई येथे उदरनिर्वाहासाठी गेलेले नागरिक यात्रेनिमित्त गावाकडे परत येतात. त्यामुळे गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. माताभगिनींच्या औक्षणाने पाहुण्यांचे स्वागत होत असून सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे तरुण-तरुणींमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे.शेखागौरी मंदिर हे गावातील विविध धर्मीय लोकांमध्ये बंधुभाव व एकतेचे प्रतीक मानले जाते. या देवस्थानामुळे गावात सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता आणि मानवतेची भावना दृढ झाली आहे. भेद सारे मावळू द्या... या उक्तीप्रमाणे गावात कोणताही भेदभाव नसून सर्वजण एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात.

यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी संदल व ताशे जंगी मुकाबला तसेच ऑर्केस्ट्रा कार्यक्रम होणार आहे. दुसऱ्या दिवशी सोंगांचे कार्यक्रम, जंगी मुकाबला, 'पुण्याचे पाखरू' नाटक आणि लोकनाट्य तमाशा सादर केला जाणार आहे. तिसऱ्या दिवशी कल्लगीतुरा, लोकगीत, धनगर ओव्या तसेच कुस्त्यांचा फड रंगणार असून रात्री भव्य समारोपाचा कार्यक्रम होणार आहे.

या यात्रेमुळे मालवंडी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या संख्येने भाविक व नागरिक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

- आपले नम्र : समस्त ग्रामस्थ व यात्रा कमिटी, मालवंडी यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन खालील प्रमाणे

शुक्रवार, दिनांक १/५/२०२६ रात्री ठीक १०:०० वाजता: संदल व ताफे जंगी मुकाबला रात्री ठीक ११:०० वाजता: ऑर्केस्ट्रा धुमाकूळ (बारामती)

टीप : शोभेचे दारूकाम (जी.एम.फायरवर्क्स, बार्शी) शनिवार, दिनांक २/५/२०२६ रात्री ठीक ८:०० वाजता: पारंपारिक सोंगांचा कार्यक्रम रात्री ठीक ९:०० वाजता: जंगी मुकाबला (अमर बँड, बारामती; बाबूलाल ब्रास बँड, विंचूर; शेख मास्टर बँड, नाशिक) रात्री ठीक ११:०० वाजता: पुण्याचं पाखरू (सिनेतारका: वर्षा पवार निर्मित) रात्री ठीक ११:०० वाजता: बुवासाहेब पिंपरीकर यांचे लोकनाट्य तमाशा मंडळ टीप : शोभेचे दारूकाम (मयूर फायरवर्क्स, तेरखेडा; स्टार फायरवर्क्स, माणकेश्वर; सुपर फायरवर्क्स, आष्टी)रविवार, दिनांक ३/५/२०२६ सकाळी ठीक १०:०० वाजता: कलगीतुरा, लोकगीते व धनगर ओव्यांचा कार्यक्रम सकाळी ठीक ३:०० वाजता: जंगी कुस्त्यांचा फड रात्री ठीक ९:०० वाजता: मंगला बनसोडे लोकनाट्य तमाशा मंडळ, करवडे



# भालेवाडीत पाणी पेटले,जलजीवन मिशनच्या कामाचे तीनतेरा

## सुविधेपासून वंचित संतप्त ग्रामस्थांचा बिडीओला सवाल



दैनिक वादळ वार्ता
**मारेगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पेसा अंतर्गत येत असलेली ग्रामपंचायत भालेवाडी येथील जल जीवन मिशन अंतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा यावर पर्यायी व्यवस्था करून द्यावी,बंद असलेले कामे त्वरीत चालू करा.अर्ध्यावर असलेले चावडीचे काम चालू करण्यात यावे.आदिवासी बहुल गाव सोयीसुविधेपासून वंचित ठेवणे म्हणजे संविधानिक मूल्य येथे जोपासली गेली नसुन कायम दुर्लक्षित झाल्याचा ठपका ग्रामस्थांनी ठेवला.

मारेगाव तालुक्यातील भालेवाडी येथिल जलजीवन मिशनचे काम अनेक दिवसापासून बंद आहे. भालेवाडी येथे पाण्याची टंचाई असताना सुद्धा जलजीवन मिशन अंतर्गत नवीन पाईपलाईनचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. व तसेच पडलेल्या पाईपचे काम देखील झालेले नाही. बंद असलेल्या चावडीचे काम त्वरित चालू करावे आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे अन्यथा भालेवाडी ग्रामस्थ पंचायत समिती समोर आमरण उपोषण करेल व सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे बिडीओ भिमराव व्हंनखंडे यांना दिलेल्या निवेदनात नमुद आहे. या प्रसंगी हुसेन ढोबरे,सुधाकर आत्राम, सोनु खडसे,रविंद्र टेकाम,संतोष आत्राम,गोसाई माफूर, नवसू सुडीत,भिमराव जांभुळकर यांनी अंकुश माफूर यांच्या मार्गदर्शनात निवेदन सादर केले.

# टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबईच्या चार विद्यार्थ्यांची नागभिड तालुक्यातील नऊ गावांत क्षेत्रभेट

दैनिक वादळ वार्ता
**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**



सामुहिक वन हक्क कायदा अनुसुचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी अधिनियम २००६ नियम २००८ सुधारित२०१२ अंतर्गत प्रत्यक्ष अंमलबजावणी, तसेच कलम ३(१)(झ) अंतर्गत वनक्षेत्राचे संवर्धन, मनरेगा अंतर्गत वृक्ष लागवड, तेंदुपत्ता संकलन आदीं विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबईचे चार विद्यार्थ्यांनी नागभिड तालुक्यातील नऊ गावांत (एफईएस) या संस्थेमार्फत क्षेत्रभेट पुर्ण करण्यांत आली. नागभिड तालुक्यातील किरमटी, खडकी, सावंगी, कोजबी, धामणगाव, सोनुली, येनोली, देवपायली, कोदेपार, या नऊ गावांमधे सामुहिक वन हक्क कायदा अनुसुचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी अधिनियम अंतर्गत मोठ्या प्रमाणात मनरेगा, वृक्षलागवड, तेंदु संकलन, श्रमदान, आदीं विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबईचे अनु देशांतरी, करन कुमार, मीनल गोयल, ऋजुता आगाशे या चार विद्यार्थ्यांना संपुर्ण विषयांची सविस्तर माहिती गणेश भुते यांनी दिली.

तिस दिवसीय या क्षेत्रभेटीमधे प्रत्यक्ष गावांतील विद्यार्थी, ग्रामस्थ, वनहक्क समितीचे सदस्य, महिला यांचे सोबत संवाद साधला. या कायद्या अंतर्गत गावकऱ्यांना हक्क मिळाला असुन स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाला असल्याने मजूराचे स्थालांतरण थांबले असल्याचे अभ्यासाअंती दिसून आले. कायद्याचे अंमलबजावणी मुळे गावकऱ्यांमध्ये हे जंगल आपले आहे. ही भावना निर्माण झाली. तसेच ग्रामसभेत जंगल गस्ती, चराई, गैणखनिज गोळा करणे व विक्री, आदी बाबत नियमावली तयार करण्यात आली. तर बँक खाते, आर्थिक व्यवहार, लेखा परिक्षण व ऑडिट बाबत नियम तयार करणे तथा स्वयंस्फूर्तीने श्रमदानातून जंगलाचे संरक्षण करणे आदीं बाबतींत संपुर्ण माहिती विद्यार्थ्यांना गणेश भुंते यांनी दिली. एकूणच सामुहिक वन हक्क कायदा ग्रामिण भागांत शाश्वत विकासाचे एक प्रभावी माध्यम ठरतं असुन, गावकऱ्यासाठी आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनालाही चालन देत असल्याचे या क्षेत्रभेटीत दिसुन आल्याने विद्यार्थी समाधानी झाल्याचे गणेश भुते यांनी सांगितले.

# पुस्तक विक्रीतील नफाखोरी साठी बाहेरील विक्रेत्याला संधी

## स्थानिक विक्रेत्यांची शिक्षण विभागाकडे तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**वरोरा । प्रतिनिधी**

येथील सेंट निस शाळा प्रशासनाने शहरातील पुस्तक विक्रेत्यांना डावलून बाहेरील विक्रेत्याला प्राधान्य दिल्याचे म्हटले जाते. यामुळे स्थानिक पुस्तक विक्रेत्यांनी एक आज गुरुवार दि. ३० एप्रिल रोजी एकत्र येत सेंट निस हायस्कूल वरोरा प्रशासनाविरोधात गट शिक्षणाधिकाऱ्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. वरोरा येथील सेंट निस शाळा प्रशासन नेहमीच यांना त्या कारणाने चर्चेत राहिले आहे. काही दिवसांपूर्वीच पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्य शाळेमधून विकत असल्याचा आरोप सदर शाळा प्रशासनावर झाला होता. त्यामुळे शाळा प्रशासनाने वेगळी युक्ती वापरून पुस्तके व शैक्षणिक साहित्य विकण्याचे काम सुरूच ठेवले असल्याचे दिसून येते. दरम्यान विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर केल्यानंतर सेंट निस हायस्कूल कडून पालकांच्या व्हाट्सअप ग्रुपवर पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत असा संदेश टाकण्यात आला. परंतु प्रत्यक्षात वरोरा शहरातील कोणत्याही पुस्तक विक्रेत्याकडे शाळेने दिलेल्या यादीतील पुस्तके उपलब्ध नसल्याचे आढळून आले. यानंतर पालकांनी याबाबत शाळेत जाऊन विचारना केली असता त्यांना विशिष्ट दुकानाचे नाव सांगण्यात आले. परिणामी बाजारपेठेतील कोणत्याही दुकानात पुस्तके नसल्याचे माहित असताना शाळा प्रशासनाने पालकांना ४० ते ४५ अंश सेल्सिअस तापमानात फिरायला लावल्याने पालकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शाळेने पुस्तके मिळत असलेले दुकान 'बघेले लॉन' परिसरातील छुप्या पद्धतीने सुरू केल्याचा आरोप आहे. निकालाच्या दिवशी अनिल ट्रेडर्स (मुल) या बाहेरील विक्रेत्याचा बॅनर लावून पुस्तक विक्री सुरू करण्यात आल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे आर्थिक फायद्यासाठी स्थानिक विक्रेत्यांना जाणीवपूर्वक डावलून बाहेरील विक्रेत्याला प्राधान्य दिल्याचे उघड होत आहे. तसेचशाळे मार्फत पुस्तकांची दिलेली यादी पालकांना संभ्रमात टाकनारी आहे. दरम्यान यादीतील पुस्तके शासनाने निर्देशित केलेली बालभारतीची की खाजगी प्रकाशनाची या बाबत देखील शाळेने सभ्रम निर्माण केला आहे. काही स्थानिक विक्रेत्यांनी शाळेशी संपर्क साधून पुस्तकांची यादी मागितली असता त्यांना ती देण्यात आली नाही. पुस्तके व शैक्षणिक साहित्य विक्रीच्या अर्थकारणातून शाळेनेच हा प्रकार केला असल्याचा आरोप आहे . शासनाने शाळेमधून पुस्तके व शैक्षणिक साहित्य विकण्यावर निर्बंध लावले असल्याने वेगळ्या पद्धतीने शाळा हे कार्य घडवून आणण्यासाठी दिसून येते. या सर्व प्रकारामुळे स्थानिक व्यापाराला फटका बसत असून शाळेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.शिक्षण विभागाच्या नियमांनुसार शाळा कोणत्याही विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदी करण्याची सक्ती करू शकत नाही. तरीही पालकांना अप्रत्यक्षपणे ठराविक ठिकाणीच जाण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणी स्थानिक पुस्तक विक्रेत्यांनी जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी, गटशिक्षण अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाकडे तक्रार दाखल केली असून, तात्काळ चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता या प्रकरणात प्रशासन काय भूमिका घेते याकडे साथनिक पुस्तक विक्रेतायचे लक्ष लागले आहे.

# सिंघम रिटर्न : आयुष नोपाणी चंद्रपूरचे नवे पोलीस अधीक्षक

## वरोरा उपविभागातील धडाकेबाज कारवायांनंतर पुन्हा जिल्ह्यात दमदार एन्ट्री

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**



कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर आणि तडफदार कारवायांसाठी ओळखले जाणारे आयुष नोपाणी यांची चंद्रपूर जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती होताच सिंघम रिटर्न अशीच चर्चा जिल्ह्यात रंगू लागली आहे. वरोरा उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीची आठवण आजही नागरिकांच्या मनात ताजी असून, त्यांच्या पुनरागमनामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींमध्ये धाक निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.वरोरा उपविभागात कार्यरत असताना नोपाणी यांनी अवैध व्यवसायांविरुद्ध अक्षरशः मोहिमच उघडली होती. वाळू तस्करी, अवैध दारू विक्री, जुगार अड्डे, सट्टेबाजी यांसारख्या बेकायदेशीर धंद्यांवर त्यांनी चालवलेल्या सलग आणि प्रभावी कारवायांमुळे अनेकांचे धंदे बंद पडले. अवैध धंदे करणाऱ्यांना सळो की पळो करून सोडत त्यांनी कायद्याचा धाक प्रत्यक्षात उतरवला होता.

त्यांच्या कार्यपद्धतीत फक्त धडक कारवायाच नव्हत्या, तर अचूक माहिती संकलन, गुप्त जाळ्याची मजबुती, आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी यांचा संगम होता. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कारवाईला परिणामकारकता लाभली. अनेक प्रकरणांमध्ये तात्काळ प्रतिसाद, आरोपींचा जलद शोध आणि ठोस पुराव्यांवर आधारित तपास यामुळे पोलीस यंत्रणेची विश्वासार्हता वाढली.

कठोर कारवाईसोबतच नोपाणी यांनी जनतेचा पोलीस ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यावरही भर दिला. नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद, पोलीस-जनता संवाद वाढवणे आणि सर्वसामान्यांना सुरक्षिततेची हमी देणे यामुळे वरोरा उपविभागात पोलीस प्रशासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण झाली होती.

आता पोलीस अधीक्षक म्हणून चंद्रपूर जिल्ह्याची धुरा सांभाळताना नोपाणी यांच्यासमोर औद्योगिक पट्टा आणि वाढती गुन्हेगारी यांसारखी अनेक आव्हाने आहेत. मात्र त्यांच्या आधीच्या अनुभवावरून या आव्हानांना समर्थपणे तोंड देत ते जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.नोपाणी यांच्या पुनरागमनामुळे पोलीस दलात नवी ऊर्जा निर्माण होण्याची चिन्हे असून, गुन्हेगारी प्रवृत्तींवर पुन्हा एकदा कडक कारवाईची मोहीम सुरू होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. चंद्रपूर जिल्ह्यासाठी हे सिंघम रिटर्न ठरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २९ वर्षे ९ महिन्यांच्या प्रदीर्घ सेवेनंतर चंद्रशेखर सुपडू पाटील सर सेवानिवृत्त

दैनिक वादळ वार्ता
**पालघर । प्रतिनिधी**

पूज्य आचार्य भिसे विद्यालय, कासा येथील पर्यवेक्षक चंद्रशेखर सुपडू पाटील सर यांनी तब्बल २९ वर्षे ९ महिने निष्ठा, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थीकेंद्रित सेवेनंतर आज सेवानिवृत्ती स्वीकारली. यानिमित्त विद्यालयात भावनिक वातावरणात त्यांना सश्रूनयनांनी निरोप देण्यात आला. या निरोप समारंभास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी आमदार आनंदभाई ठाकूर, संस्थेचे चिटणीस आप्पासाहेब भोये, पांडुरंग बेलकर सर, सदस्य हितेंद्र पाटील, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनघा गायकवाड मॅडम, माजी मुख्याध्यापक धनू सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पाटील सरांचा शाल, श्रीफळ, पूज्य आचार्य भिसे गुरुजींची प्रतिमा तसेच चांदीचे निरंजन देऊन सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक आणि सहकाऱ्यांनी आपल्या मनोगतातून पाटील सरांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या जिव्हाळ्याचा उल्लेख केला.शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, माजी विद्यार्थी, नातेवाईक व आप्तेष्ट यांच्या उपस्थितीत पार पडलेला हा समारंभ अत्यंत भावनिक आणि संस्मरणीय ठरला.



# केज शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगर पंचायत आमच्या ताब्यात द्या; अक्षय भैय्या मुंदडा यांची केजकरांना भावनिक साद

## महाराष्ट्र दिन आणि वाढदिवसानिमित्त भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केजशहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी आणि शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी यावेळेस केज नगर पंचायत आमच्या ताब्यात द्या,असे भावनिक आवाहन युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा यांनी केजकरांना केले. महाराष्ट्र दिन आणि अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून केज शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य खुल्या व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

**खेळाडूंना प्रोत्साहन आणि विकासाचा संकल्प**

मैदानात खेळाडूंचा उत्साह वाढवताना अक्षय भैय्या यांनी केज शहराच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले.ते म्हणाले की,शहराच्या मूलभूत सुविधांपासून ते सुशोभीकरणापर्यंत अनेक कामे मार्गी लावण्यासाठी सत्ता परिवर्तनाची गरज आहे. तरुणांना खेळाच्या माध्यमातून एकत्र आणतानाच,शहराच्या विकासासाठी त्यांनी जनतेकडे खंबीर पाठिंब्याची मागणी केली.

**मान्यवरांची मांदियाळी**

या उद्घाटन सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज नेत्यांनी उपस्थिती लावली होती. यामध्ये प्रामुख्याने पोलिस उप अधीक्षक वेंकटरामन,रणजीत सिंह पाटील,पशुपतिनाथ दांगट पाटील,डॉ.वासुदेव नेहरकर,कबीर भाई इनामदार,भाई मोहन गुंड,हनुमंत भोसले सर,सुनील घोळवे,खद्दिर कुरेशी यांच्यासह झिशान कादरी,विनोद गुंड, प्रकाश मुंडे,राहुल भैय्या गदळे,सुरज घुले,संतोष जाधव,अकबर इनामदार, इत्तेशाम कादरी,गणेश कुलकर्णी,डॉ. विजयकुमार मोराळे, आमेर इनामदार आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

**स्पर्धेचे स्वरूप**

अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या स्पर्धेत अनेक नामांकित संघांनी सहभाग नोंदवला आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून खेळाडूंमध्ये क्रीडा संस्कृती जोपासली जावी आणि तरुणांनाव्यासपीठ मिळावे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे संयोजकांकडून सांगण्यात आले.या कार्यक्रमाला केज शहरातील नागरिक, क्रीडाप्रेमी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.अक्षय भैय्यांच्या या भावनिक सादेमुळे केज शहरा मधील आगामी राजकीय वातावरणाला आता पासूनच चर्चांना उधाण आले आहे.



# आशिष धिवार यांच्या कुटुंबाची दीपक कांबळे यांनी घेतली भेट

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

न्यायालयीन कोठडीत असताना मृत्य झालेल्या बीड जिल्ह्यातील काळेगाव घाट ता. केज येथील युवक आशिष धिवार यांच्या कुटुंबीयांची केंद्रिय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले आणि युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या आदेशावरून रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्यासह कार्यकर्त्यांनी भेट घेऊन दोषींवर कारवाईची मागणी केली.



केज तालुक्यातील आशिष अशोक धिवार यांचा न्यायालीन कोठडीत असताना बीड येथे मुत्यु झाला. केंद्रिय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले आणि युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या आदेशा वरून रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे आणि केज तालुका सरचिटणीस गौतम बचुटे, दिलीप बनसोडे, यांच्यासह कार्यकर्त्यांत्या आशिष धिवार यांच्या कुटुंबाची काळेगाव येथे जाऊन भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार अशोक भंडारे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

निवेदनात आशिष धिवार याचा दि. २८ एप्रिल रोजी न्यायालीन कोठडीत तुरुंग पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे, मानसिक छळ व आरोग्य सुविधा देण्यात दिरंगाई केल्यामुळे आणि पोलिस कोठडीतील अमानुष छळ व मारहाणीमुळे झालेल्या संशयास्पद मुत्युची एस.आय.टी. मार्फत चौकशी करून संबधीत दोषी तुरुंग अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी आणि चुकीची माहिती अहवाल देणाऱ्या आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यावर कडक कायदेशीर कार्यवाही करून त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे. तसेच आशिष धिवार यांच्या कुटुंबाला शासनाने २५ लाख रु. ची मदत करण्यात यावी. अशा मागण्यांचा समावेश आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत उज्वल यश

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या फेब्रुवारी २०२६ बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन यामध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ८३.०८ टक्के, कला शाखेचा ४३.९५ टक्के, वाणिज्य शाखेचा ५० टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम ६६.१२ टक्के निकाल लागला आहे .

बारावीच्या परीक्षेत सुंदराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम रेदासनी आलेक प्रमोद(८७.५ %), द्वितीय कुलकर्णी सुमेधा महेश (८५.८३% ), तृतीय इंद्राणी वरद दत्तप्रसाद(८३.१७ %), कला शाखातुन प्रथम बोरगे प्रज्ञा साहेबराव (७३.१७ %),द्वितीय पठाण सादिया अन्सर खान (७२.६७ %),तृतीय राऊत करण कारभारी (६८.८३%) तर वाणिज्य शाखा: प्रथम शर्मा सक्षम मनोज (८२.१७%), द्वितीय कासट खुशी विवेकानंद (७९.८३%), तृतीय धारक आदित्य भगवानराव (७८%) तर व्यावसायिक अभ्यासक्रम: प्रथम नवघरे रूपाली दगडोबा (७९.१७%), द्वितीय घेवारे अश्विनी आसाराम (७५% ), तृतीय यादव रंजना प्रकाश (७३.५०%) यांनी यश संपादन केले.


सुमेधा कुलकर्णी


वरद इंदाणी


आलेक रेदासणी

बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य ड.भानुदासराव डक,माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल.चव्हाण, प्राचार्य डॉ.जी. के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के. मुळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, पर्यवेक्षक महादेव अलझेंडे ,स्वप्निल टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांनी अभिनंदन केले.

# सांची बुद्ध विहारात तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५७० वी जयंती उत्साहात साजरी

## तथागताने दिलेल्या धम्माच्या अनुकरणातच मानवाचे कल्याण–एस बी मोरे

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतीन तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५७० व्या जयंती सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे उत्साहात साजरी करण्यात आली त्या अनुशंगाने दि १ मे २०२६ रोजी सकाळी १०.वा पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभा महिला ता अध्यक्षा मंदाताई साळवे यांच्या हस्ते करण्यात आले त्या नंतर पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे संस्कार उपाध्यक्ष आद.एस बी मोरे हे होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा ता अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या ठिकाणी प्रमुख मार्गदर्शनात बोलताना एस बी मोरे यांनी सिद्धार्थ गौतमाने राजघराण्यात जन्म घेतला परंतु रोहिनी नदीच्या पाण्यावरुन शाक्य आणी कोलीय यांच्यात होणा–या युद्धास शाक्य संघाचा सदस्य असताना विरोध करुण त्यांनी राजवैभव, पत्नी, पुत्र आणि सर्व ऐश्वर्याचा त्याग करून गृहत्याग केला व प्रदीर्घ साधनेनंतर बोधीवृक्षाखाली त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते ‘बुद्ध’ झाले – तथागत संम्यक संबुद्ध झाले . ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी मानवजातीसाठी दुःखनिवारणाचा मार्ग दिला तथागथाचा दु:ख मुक्तीचा मार्ग म्हणजे आर्य अष्टागीकमार्ग होय याचे अनुकरण करण्यातच मानवाचे कल्याण आहे असे प्रतिपादन केले कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हा अध्यक्षा आद.कमलताई डोंगरे, संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे, संस्कार सचिव आशाताई मोरे, शामभाऊ वाघमारे, पर्यटन सचिव के व्ही साळवे, संघटक बी सी डोंगरे, शोभाताई भोजने सह जिल्हा तालुका शहर ग्रामीण पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येन उपस्तीत होते या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी मानले, या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभा महिला तालुका संस्कार उपाध्यक्षा वैशालीताई नवनाथ गायकवाड यांनी भोजनदान दिले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी,डि एस साळवे, मोहन काकडे, बळीराम काकडे, भगवान डोंगरे, बाबासाहेब घनघाव, राजेभाऊ साळवे, विशाल साळवे, समाधान साळवे, तात्यासाहेब साळवे, भानुदास साळवे, चंद्रकला साळवे, वंदना साळवे, अंतिका गायकवाड विशाखा वाघमारे, वंदना घनघाव सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



# बाजार समिती कार्यालयात उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील बाजार समिती कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त आज दि . १ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, संचालक संजय कचरे, कदीर पठाण, अमोल जाधव, नंदकिशोर सजगणे, मा. प. स. सदस्य मिलिंद लगाडे, सचिव हरिभाऊ सवणे, सह सचिव रविंद्र नाईकनवरे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत देशभक्तीपर घोषणा दिल्या. कार्यक्रमास बाजार समितीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# कोळगाव येथे भीषण आग: ‘धनश्री बायोफ्यूल’मधील रॉ मटेरियल जळून खाक; १० ते १५ लाखांचे नुकसान



**दैनिक वादळ वार्ता**
**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथे येथील उद्योजक गणेश दगडू साके यांच्या ’धनश्री बायोफ्यूल’ उद्योगाला भीषण आग लागल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. गट नंबर ७७२ मधील साठवून ठेवलेले रॉ मटेरियल या आगीत पूर्णपणे जळून खाक झाले असून, यामध्ये सुमारे १० ते १५ लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा परिसरातील गट नंबर ७७२ मध्ये गणेश साके यांचा धनश्री बायोफ्यूलचा प्रकल्प आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कच्चा माल (रॉ मटेरियल) साठवून ठेवण्यात आला होता. या साठ्याला अचानक आग लागली. वाळलेले रॉ मटेरियल असल्याने आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केले.

**५ तास आगीचे तांडव**

आगीची तीव्रता इतकी भीषण होती की तब्बल ५ तास ही आग धगधगत होती. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट परिसरात लांबून दिसत होते. स्थानिक पातळीवर आग विझवण्याचे प्रयत्न अपुरे पडत होते. अखेर घटनेची माहिती मिळताच श्रीगोंदा नगरपालिकेचा अग्निशामक दलाचा बंबा घटनास्थळी दाखल झाला. अग्निशामक दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले.

**मोठे आर्थिक संकट**

आग आटोक्यात आली असली तरी तोपर्यंत १० ते १५ लाखांचे रॉ मटेरियल जळून कोळसा झाले होते. या आगीमुळे उद्योजक गणेश साके यांचे मोठे नुकसान झाले असून, परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077